# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE (ECHO GROUP)

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. Shashi Tiwari

VOL: XXIV | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, JUNE 2022 | No. 05


## पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

नीतिसूत्रे ४:१-१०

१. मुलांनो, बापाचें शिक्षण ऐका, व सुज्ञता समजण्यासाठी त्याकडे लक्ष द्या.

२. कारण मी तुम्हांस उत्तम धर्मोपदेश करितो; माझे धर्मशास्त्र सोडू नका.

३. कारण मी आपल्या बापाचा पुत्र होतो, माझ्या आईच्या दृष्टीनें मी सुकुमार व एकुलता एक होतो.

४. तो मला शिकवी व म्हणे, माझी वचने तुझ्या चित्ती राहोत; तूं माझ्या आज्ञा पाळ व दीर्घायु हो.

५. ज्ञान संपादन कर; सुज्ञता संपादन कर; ती विसरूं नको, माझ्या तोंडच्या वचनाला पराणमुख होऊ नको.

६. ते सोडूं नको म्हणजे ते तुझे संरक्षण करील; त्याची आवड धर म्हणजे ते तुझा संभाळ करील.

७. ज्ञान ही श्रेष्ठ चीज आहे म्हणून तें संपादन कर; आपली सर्व संपत्ति वेचून सुज्ञता संपादन कर.

८. त्याला ऊच्च पद दे म्हणजे ते तुझी उन्नति करील; त्याला कवटाळून राहशील तर तें तुझे गौरव करील.

९. ते तुला शोभिवंत शिरोभूषण देईल; तुला सुंदर मुकुट देईल.

१०. माझ्या मुला, माझी वचनें एकून घे, म्हणजे तुझ्या आयुष्याची मर्यादा वृद्धिंगत होईल.

# तुझ्या विलापाचे हर्षात रुपांतर होईल? (स्तोत्र ३०:११)

## YOUR MOURNING WILL TURN INTO JOY! (Psalm 30:11)

(पास्टर एस्. सॅम. सेल्वाराज)

संकटाच्या समयी आपण आपल्या मित्रांकडे जातो किंवा सल्ला घेण्यासाठी डॉक्टरांकडे जातो ते आपल्याला कदाचीत ''काळजी करू नका.'' सर्वकाही ठीक होईल असे बोलून आपले सांत्वन करतील समया बरोबर तुमच्या समस्या देखील नाहिशा होतील. देवाची अनेक लेकरे दु:ख, यातना आणि क्लेश यांत जगत असतात. आमच्या समस्या जेव्हा वाढतात. तेव्हा, आपण आशा गमावतो. देवाच्या आपल्या जीवनातील मार्गदर्शनाबद्दल जेव्हा आपणात निश्चितता नसते तेव्हा आपण अधीक काळजी-चिंता करतो. उदा. जगातील सर्व लोकांना कोविड-१९च्या आघातामुळे पुष्कळ दु:ख सहन करावे लागले. कोणतेही दु:ख, त्रास, आजारपणाची शिक्षा हि वेदनादायक असते. आपल्या जीवनातील घडलेल्या घटनांबद्दल आपण गांभिर्याने विचार करतो, तेव्हा सहाजीकच मनात विचार येतो. ''हे सर्व देवाच्या नकळत घडले आहे कां? माझ्या समस्यांकडे देवाने लक्ष दिले नाहि कां?'' परंतु आपण हे लक्षात ठेविले पाहि कि आपल्या जीवनात देवाच्या नकळत असे कांहीही घडत नसते. आपण अशा वेदनामय अनुभवातून जात असताना, देव ती दु:खे आणि त्रास आनंदात-हर्षात बदलतो. घाबरून जाऊ नका! ''...तुमच्या दु:खाचा आनंद होईल'' (योहान १६:२०)

मत्तय ५:४ या वचनात आपण वाचतो, ''जे शोक करितात ते धन्य, कारण त्यांस सांत्वन प्राप्त होईल.'' आपणांस असे वाटते की, या जगातील सर्व भौतिक गोष्टिंचा उपभोग घेणारे ते धन्य किंवा आशीर्वादीत लोक आहेत. परंतु देव म्हणतो शोक करणारे ते धन्य! हे विलक्षण किंवा चमत्कारीक नाही का वाटत? ज्या देवाला शोक करणारे ते धन्य, त्याला हे देखील पूर्णपणे ठाऊक आहे कि, शोक आनंदात बदलणार! लोकांना हे कबूल करणे कठीण वाटते.

स्तब्ध आणि खिन्न स्थितीत असलेले मन हि गहन अशा दु:खात असलेल्या व्यक्तिची स्थिती दर्शविते. दु:ख उद्भवण्याचे कारण कदाचीत बेकारी, आजार, पैशांची कमतरता, कामाच्या ठिकाणी किंवा कुटुंबातील समस्या, भविष्याची चिंता इत्यादी असू शकते. आमचे दु:ख कोणतेहि असू द्या, प्रभु म्हणत आहे, आम्ही जे सर्वजण अशा कठीण समस्यांतून जात आहोत ते आम्ही आशीर्वादीत आहोत आणि सांत्वन पावणार आहोत. त्या कठीण परिस्थितीत आनंदात बदलतील, हे जरी प्रभु येशू ख्रिस्तानें फार पूर्वी अभिवचन दिले असले तरी देखील येथूनपुढे सुखी आणि आनंदीत असा. ''**यास्तव देवाच्या पराक्रमी हाताखाली लीन व्हा, यासाठी की त्याने योग्य वेळी तुम्हांस उंच करावे.**'' (१ पत्र ५:६)

(अनुसंधान पान ३ वर)

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

(ECHO GROUP)



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...

"तो तुझ्या सीमांच्या ओत शांतता पसरितो;
उत्कृष्ट गव्हाने तुला तृप्त करितो."
(स्तोत्र १४७:१४)



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

**CHIEF EDITOR**
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

**MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**ADMINISTRATION**
Bro. N. Prakasam, M.A., General Manager

**EDITORIAL BOARD**
Sis. Jesy Veena Sam
Bro. M. Paulraj, M.A., B.Ed.
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.

**EDITOR, PUBLISHER & PRINTER**
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858

**E.mail ID**
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**WEBSITES**
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

**YOUTUBE CHANNEL**
Echo of His Call

प्रभु मधील अती प्रियांनो,

आम्ही तुम्हा सर्वांना आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या अतुल्य नामात शुभेच्छा देत देत आहोत! आजपर्यंत अद्भूत रितीने आम्हांस चालवित आलेल्या आपल्या देवाला स्तुति देत आहोत.

### एको ऑफ हिज कॉल मासिके

❖आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या अवर्णनिय दयेमुळे, तो आम्हांस **एको ऑफ हिज कॉल** मासिक १६ भाषांमध्ये छापण्यास शक्य होऊ देत आला आहे. या सेवे करिता प्रार्थना करण्याऱ्या आणि आर्थिक पाठबळ देणाऱ्या सर्वांना देव विपुल आशीर्वाद देईल. या मासिकामुळे विविध भाषा बोलण्याच्या लोकांना देवाच्या प्रेमाचा स्पर्श होत आहे.

### निवासी नहेम्या बायबल कॉलेज (हिन्दी)

❖आम्हाला निवासी नहेम्या बायबल कॉलेज (हिन्दी) आम्हाला निवासी नहेम्या बायबल कॉलेज (हिन्दी) करिता आणखीन पुरूष विद्यार्थ्यांची गरज आहे. वर्गाची सुरूवात ६ जून २०२२ पासून होत आहे. आम्ही पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या स्वरूपात विनामुल्य शिक्षण, भोजन आणि निवासाची सोय पुरवित आहोत. कृपया उपलब्ध माध्यमां द्वारे ही बातमी तुमच्या मित्रांना कळवा. आम्ही १ वर्षाचा 'सर्टफिकेट' अभ्यासक्रम आणि २ वर्षांचा 'डिप्लोमा' अभ्यासक्रम देत आहोत. आमचे नहेम्या बायबल डिप्लोमा कॉलेजला 'एशिया थियॉलॉजीकल असोसिएशन'च्या सभासदत्वचा दर्जा प्राप्त होऊन आशीर्वादीत आहे. हि संस्था जगभरातील बायबल कॉलेजांची अधीकृत प्रतिनिधीत्व करीत आहे.

### सायंकालीन नहेम्या बायबल कॉलेज (तामिळ)

❖आमचे सायंकालीन तामिळ बायबल कॉलेज देखील व्यवस्थित कार्यरत आहे. हे कॉलेज देखील ६ जून २०२२ रोजी सुरू होईल. आम्हाला या कॉलेजकरिता योग्यतापात्र अशा स्त्री-पुरूष विद्यार्थ्यांची गरज आहे. आम्ही १ वर्षाचा सर्टिफीकेट अभ्यासक्रम आणि दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम देत आहोत.

### नहेम्या बायबल कॉलेजचे ग्रंथालय

❖आम्ही नहेम्या बायबल कॉलेच्या ग्रंथालयातील सर्व पुस्तकांची संगणकामध्ये (रितसर नोंद) करण्यास प्रभु कृपेने सुरूवात केली आहे. ग्रंथालयात अंदाजे ७,००० पुस्तके आहेत. त्यांची ग्रंथालयाच्या पद्धतीनुसार नोंद करणे प्रचंड काम आहे आणि तेवढाच मोठ्या प्रमाणात खर्च देखील. हे काम आम्हाला आमच्या शक्तिपलिकडचे वाटते. आम्हाला विश्वास आहे, की देव या कामासाठी आम्हाला अधीक नीधी उपलब्ध करुन देईल. "**माझा देव आपल्या संपत्यनुरूप तुमची सर्व गरज ख्रिस्त येशूमध्ये गौरवानें पुरविल.**" (फिलीप्पै ४:१९)

### नहेम्या बायबल कॉलेजची २०२१-२२ या शैक्षणीक वर्षासाठीची पदवीदान उपसना

❖देवाच्या इच्छेनुसार नहेम्या बायबल कॉलेजची २०२१-२२ या शैक्षणीक वर्षासाठीची पदवीदान उपसना शुक्रवार, दिनांक ३-६-२२ रोजी सायंकाळी ५ वाजता, बलार कालवी नीलायम, वेपरी, पुरासवाकम, चेन्नाई-७ येथे संपन्न होईल. आम्ही तुमच्या प्रार्थना अपेक्षित आहोत. त्या दिवशी तुम्ही चेन्नईत असाल, तर कृपया सहभागी व्हा.

**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) ✪ BIBLECOR - Postal Courses (3 languages) ✪ Online Courses ✪ Theological Correspondence Courses (2 languages) ✪ Church Planting ✪ Nehemiah Bible Colleges ✪ Gospel Printing Press ✪ Great Commission Partners ✪ St. Paul's Matriculation School ✪ Crusades ✪ Community Development

## उत्तर भारतात शुभवर्तमान पोहचविणे

❖ उत्तर भारतातील विविध भाषा बोलणाऱ्या लोकांना त्यांच्या भाषेत शुभवर्तमान देवून त्यांना मदत करण्याची अनेक दिवसांपासून इच्छा होती. आमच्या नहेम्या हिन्दी बायबल कॉलेजकरिता अनेक विद्यार्थी आणावेत. यासाठी मी ओरिसामधील रायगाडा, परालखेमुंडी आणि कंदनमाल या भागांमध्ये प्रत्यक्षात जाण्याचे ठरविले. जरी माझ्याकरिता त्रासाचे होते, तरी निश्चय केला. आपल्याला एकच जीवन आहे. तर चला ते जीवन आपल्या प्रभु येशू देवाला देवू या.

## सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल

❖ सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल उत्तम प्रकारे सुरू आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापासून शाळेत आणण्याकरिता आणि पुनः घरी नेण्याकरिता जी छोटी बस होती ती नादुरुस्त आहे; आणि दुरुस्त करून वापरण्याच्या अवस्थेत नाहि. आम्हाला नवीन बस खरेदी करण्याची गरज आहे. कृपया नीधीच्या उपलब्धतेकरीता प्रार्थना करा. देवाची इच्छा असल्यास शाळा १३ जून रोजी सुरू होईल. शाळेला देवाच्या कृपेने तामिळनाडू सरकार द्वारे हायस्कूलचे वर्ग चालविण्यास मान्यता देण्यात आली आहे. भारत सरकरने देखील शाळेस ख्रिस्ती अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेचा दर्जा दिला आहे.

❖ कृपया आमच्या टपालाद्वारे सुरू असलेले **बायबल आभ्यासक्रम, शुभवर्तमान छापण्याचे यंत्र, मंडळ्या, बाह्य सुर्वाताप्रसार सभा आणि समाज कार्यासारख्या** महत्त्वाच्या सेवांकरीता प्रार्थना करीत रहा.

❖ माझे आणि माझ्या कुटुंबाचे प्रकृति स्वास्थ्य सुस्थितीत आहे. कृपया आमचे सहकारी बंधु मैन्युएल एम्. पॉलराज, पास्टर एम्. मुथ्थु आणि बंधु इलांगोवन यांच्या प्रकृति स्वास्थासाठी प्रार्थना करा.

❖ तुम्ही ''एको ऑफ हिज कॉल'' सेवा कार्यांवर अधीकाधीक प्रेम कराल आणि आर्थिक हातभार लावाल, देव देखील तुम्हाला विपुल आशीर्वाद देईल. आम्ही प्रार्थनेत तुम्हा सर्वांची मन:पूर्वक आठवण करीत असतो. पवित्र आत्मा जर तुमची खात्रीकरून देत असेल कि या सर्व सेवा केवळ देव राज्याची वाढ होत रहावी याच सदिच्छेने - हेतुने करण्यात येत आहे; तर कृपया तुमचे दान आणि आधार या सेवा कार्याला द्या. देव निश्चितच तुम्हाला आशीर्वादीत करील.

❖ देवाने आम्हाला दु:ख-त्रास सहनातून कशाप्रकारे वाचविले यासंबंधी आमच्याकडे उघडपणे सांगता येणार नाहित अशा अनेक साक्षी आहेत. तेव्हा आम्हांकरिता प्रार्थना करीत रहा. देवाची कृपा तुम्हांसह राहो.

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**
(+91) 98412 71858 / 98410 71858
E-mail : samselvaraj333@gmail.com

(पान १ वरुन)

आपण आपल्या दुर्बलतेच्या आणि दारिद्र्याच्या दिवसांत देवाकडे पाहातो, तेव्हा तो आपल्याशी बोलत असलेले आपल्याला ऐकू येते. कोणत्याहि दु:खाशिवायचे जीवन जगणाऱ्यांना देवाची वाणी ऐकू येत नाही. आपल्याला जेव्हा निराश वाटत असते आणि दु:ख अनुभवीत असतो अशाच वेळी आपण त्याची वाणी ऐकू शकतो आणि त्याचा स्पर्श जाणवू शकतो. उलट आपल्या अनुकुल परिस्थितीत त्याची वाणी क्वचितच ऐकू येऊ शकते. त्यामुळेच देव म्हणतो, ''शोक करणारे ते धन्य.''

प्रेषित पौलाला त्याच्या शरिरात वेदना अनुभवण्यात आली, आणि त्याने देवाने शरिरातून ती दूर करावी याकरीता प्रार्थना केली. परंतु देव त्याला म्हणाला, ''**माझी कृपा तुला पुरे आहे; कारण माझी शक्ति अशक्तपणात पूर्णतेस येते.**'' (२ करिंथ १२:९) पौल एक सुखी समाधानी जीवन जगू शकला असता. परंतु देवाचा स्पर्श जाणवून न शकणारे किंवा त्याची वाणी ऐकू न शकणारे जीवन तो जगू इच्छित नव्हता. परंतु त्याने दु:खाची जीवन पसंद केले, जे त्याला देवाची वाणी ऐकण्याकडे नेऊ शकत होते, आणि असे जीवन तो आनंदमय आणि गौरवशाली जीवन समजत होता. तो म्हणतो, ''**मी कसे तरी मृतांचे पुनरुत्थान मिळवावे.**'' (फिलिप्पै ३:११). मोशे विषयी वचनांत सांगण्यात आले आहे. ''**मोशानें प्रौढ झाल्यावर आपणास फारोच्या कन्येचा पुत्र म्हणविण्याचे विश्वासाने नाकारिले; पापाचे क्षणिक सुख भोगणे यापेक्षा देवाच्या लोकांबरोबर दु:ख भोगणे हे त्याने पसंद करुन घेतले. ख्रिस्ताचा अपमान सोसणे ही मिसर देशाच्या धननिधीपेक्षा उत्तम संपत्ति आहे, असे त्याने गणिलें, कारण त्याची दृष्टि प्रतिफळावर होती.**'' (इब्री ११:२४-२६)

आपण जेव्हा तीव्र अशा त्रासात असतो अशावेळी त्यांतून बाहेर पडण्यासाठी धडपड करीत असतो. परंतु अशा प्रसंगात आपल्याच बळावर अवलंबून राहाण्या ऐवजी आपण जर देवावरच अवलंबून राहिलो, तर निश्चितच आपल्याला त्याचा स्पर्श जाणवेल. ते प्रसंग जर काळजीपूर्वक आणि धीराने हाताळले तर आपल्याला अगणीत बदल आणि आशीर्वाद यांची देणगी प्राप्त होईल. स्तोत्र कर्ता दाविद, ज्या ज्या वेळी दुष्टतेने वेढला जाई, तो मंदिरात देवाच्या समक्षतेत जाऊन त्याला विनंती करीत असे. मंदिरात तो नेहमीच देवाची उपस्थिती अपेक्षित असे आणि एखादी चूक केली असेल किंवा भयंकर अशा क्लेशात सापडला असेल स्तब्ध रहात असे. देवाने सर्व समस्यांमधून त्याल सोडविले. देवाने त्याला आशीर्वाद दिला, त्याचे सांत्वन केले आणि त्याची सर्व दु:खे आनंदात बदलली. देवाच्या प्रीय लेकरा, तू प्रतिकूल परिस्थितीतून जात आहेस का? तुझ्या समस्येतून बाहेर येण्यास देवा व्यतिरीक्त दुसरा मार्ग शोधू नकोस. जगीक मार्ग अवलंबिल्यास त्याचे परिणाम भयंकर धोका, त्रास आणि अपयश हे पदरात पडतील. कृपया हि पवित्र आत्म्याची वाणी आहे समज, जी तुला सांगत आहे, ''जर तूझा देवावर भरोसा आणि विश्वास ठेवू शकशील, तर तुझे कुटुंब, आर्थिक स्थिती, हक्क, ओळख-व्यक्तित्व आणि विशेषकरुन तुझी सेवा यासंबंधीत तुझी अपेक्षा पूर्ण होईल. तव्हा लक्षपूर्वक ऐक. या उद्देशपूर्ततेकरिता तुझी निवडीची जागा, हि तुझी मंडळी आहे. कृपया मंडळीचा आणि पाळकांचा मान राख. विस्तृतपणे हितकारक आशीर्वाद आणि हितकारक सुख हे तुझ्या मंडळीमध्ये बांधलेले आहेत. ''**आपण**

**कित्येकाच्या चालीप्रमाणे आपले एकत्र मिळणे सोडू नये, तर एकमेकांस बोध करावा; आणि तो दिवस जवळ येत आहे हे तुम्ही पाहतां, म्हणून विशेषकरुन करावा.''** (इब्री १०:२५)

### १) जीव खेदाने गळऊन जातो

''**माझा जीव खेदाने गळून जातो; आपल्या वचनाप्रमाणे मला आधार दे.**'' (स्तोत्र ११९:२८).

कोणतीहि व्यक्ति तीच्या नैराश्यामुळे स्वत:ची उंची वाढवू किंवा कमी करू शकत नाहि. त्याचप्रमाणे आपण दु:ख सहनात प्रत्यक्षात काळजी न करणे टाळू शकत नाही.

दाविद पुष्कळ समस्यांना सामोरा गेला - सर्व प्रथम शौल राजा, त्याचा सासरा, त्यानंतर त्याचा पुत्र अबशालेम, आणि अनेकदा याच्या लोकाद्वारे आणि इतर देशांच्या राजांच्या द्वारे परंतु तो त्याला हाक मारीली; ज्या देवाने त्याला पाचारण केले. त्याजवर विसंबून राहिला, देवाने त्याचे सर्व क्लेश आणि त्रास मोठ्या आनंदात बदलले!

आपल्या पैकी बऱ्याच जणांना देखील अशा कठीण समस्यांतून जावे लागते. काहि जण अति-दु:खामुळे-हृदय भंगामुळे आत्महत्या करण्याचा प्रयत्न करीतात. आम्ही मनुष्यांकडून सल्ला मागण्यास गेलो तर ते आपली फसवणूक करू शकतात. काहि आपल्याला चुकीचा सल्ला देतील. चिंता-काळजी आणि अश्रु ढाळत असताना, आपण जर पूर्णपणे देवावर विसंबून राहिलो, आणि त्याजवर विश्वास ठेविला, तर तो निश्चितपणे आणि विनाअट दु:खातून बाहेर काढील आणि अद्भुतरित्या आमचे सांत्वन करील. ''**कारण उग्र लोकांचा झपाटा जसा वादळाप्रमाणे भिंतीवर आदळावा तसा तूं दुर्बलास दुर्ग, लाचारास विषत्काली आश्रय, वादळात निवारा, उन्हांत सावली, असा त्यास झालास.**'' (यशया २५:४)

त्रास वाढत जातात; अशा प्रसंगी आपण आपला पुष्कळसा वेळ मोठ्यानें बायबल वाचण्यात घालवावा. आपल्या सारख्याच दु:खातून जात असलेल्या लेकरांना जसे त्याने सोडविले आपण देखील देवाकडून अद्भुत अशा रितीने सुटका होण्याची अपेक्षा केली पाहिजे आणि विश्वास ठेविलापाहिजे. तुमच्या अपेक्षेपेक्षा अधीक अशा गोष्टी देव निश्चितच तुमच्या जीवनात घडविल. हा संदेश देणाऱ्या मी स्वत: देखील केवळ देवावर अवलंबून राहिलो. आणि त्याचे बोलणे (वचने) मोठ्याने वाचून त्यावर पूर्ण विश्वासाने मनन केले. माझ्या वेगवेगळ्या कठीण समयात देवावर विसंबून राहिलो असताना माझ्या बायबलमध्ये मी काही वचने अधोरेखीत करून, ज्या दिवशी त्याची वाणी ऐकली आणि अविश्वसनीय असे विजय प्राप्त केल्याची तारीख लिहून ठेविली. तुम्ही देखील तसे कराल तर विजय निश्चित आहे!

### २) डोळे क्षीण झाले!

''**कष्टामुळे माझे डोळे क्षीण झाले आहेत; हे परमेश्वरा, मी दररोज तुझा धावा करितो; तुजपुढे मी आपले हात पसरितो.**'' (स्तोत्र ८८:९)

स्तोत्र कर्ता म्हणतो कष्टामुळे त्याचे डोळे क्षीण झाले आहेत. एखादी दु:खात असलेल्या व्यक्तिला त्याच्या दृष्टित फरक झाल्याचे जाणवते. खिन्नता व्यक्तिला मंद करते, विचार शक्ति कमी होते, झोप येत नाहि, स्मरणशक्ति कमी होते आणि त्या व्यक्तिची भविष्याविषयीची आशा नष्ट होते. इतरांकडून प्राप्त होत असलेली मदत देखील कमी होते. या अशा अवस्थेतून बाहेर येण्यासाठी आपण काय करु शकतो? नाऊमेदीला थारा न देता आपण दोन गोष्टि करू शकतो :-

१) आपण प्रार्थनेत देवाला आपली खरी स्थिति सांगू शकतो. ''**मी आपला वर्तनक्रम तुजपुढे मांडिला आणि तूं माझे ऐकले, तूं आपले नियम मला शिकीव.**'' (स्तोत्र ११९:२६) देवा सोबत वेळ घालवून आणि त्याजबरोबर बोलण्याने मोठे विजय प्राप्त होतात. परंतु हल्लीच्या दिवसात, लोक त्यांचा अधीकवेळ त्यांच्या स्वत:च्या बाबतीत आणि गोष्टित घालवितात, जगीक लाभाला अग्रक्रम देतात; प्रार्थनेत देवाबरोबर वेळ घालविण्या ऐवजी करमणूक आणि टि.व्हि. पाहाण्यात घालवितात.

ख्रिस्ती टि.व्हि. वर संदेश देणाऱ्या उपदेशकांनी पुष्कळशा आध्यात्मिक ख्रिस्ती जनांना आळशी आणि एकाच स्थितीत स्थिर बनविले आहे. त्यांनी अनेक प्रार्थनाशील ख्रिस्तीजनांना प्रार्थना न करणारे, शास्त्र नियमितपणे वाचणाऱ्यांना शास्त्र न वाचणारे केले आहे. हि एक सवय लागून गेली आहे. तुम्ही थोडा वेळ ख्रिस्ती कार्यक्रम पाहूशकता, आणि टि.व्हि बंदकरून प्रार्थनेत, शास्त्र वाचनात आणि मननात तल्लीन होऊ शकता. तुम्ही निश्चित विजयी होऊ शकता. परंतु जर तुम्ही तुमचा सर्व वेळ टि.व्हि कार्यक्रम अगदी पहाटे पाच वाजेपासून ते उशीरा पर्यंत पाहात राहिला तर तुम्ही निश्चितच अपयशी व्हाल. नीतिला सोडून असलेली तत्वे आणि माहिती

(अनुसंधान पान ६ वर)


## नहेम्या बाईबल कॉलेज

**निवासी आणि सायंकाळीन कॉलेज**
**वेलाचेरी आणि चेपॉक संतोषपुरम**

**माध्यम : हिंदी/तमिळ**

ECHO OF HIS CALL 1969-2019 (ECHO GROUP)

Regd. Candidate for Membership ATA NEHEMIAH BIBLE COLLEGE CHENNAI ECHO OF HIS CALL Estd. 1969

**अभ्यासक्रम डिप्लोमा इन थियॉलॉजी/सर्टिफिकेट अभ्यासक्रम (ATA)**

**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**ईश्वरविद्या सर्टीफिकेट : अेक वर्ष**
**ईश्वरविद्या डिप्लोमा : दोन वर्ष**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**

**प्रवेश करिता त्वरा करा !**

**संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज**

**10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.**
**Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858**
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

✲ ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे ✲

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार
# प्रार्थना विनंत्या

**प्रार्थना स्तुति आणि मुद्दे १९ जून २०२२ ते १८ जुलै २०२२ पर्यंत**

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## ✝ स्तुति करिता मुद्दे

| | |
|---|---|
| १९ जून | : आपला प्रभु परमेश्वर आमचे सहसंपादक बंधु मॅन्युएल एम्. पॉलराज आणि त्यांच्या कुटुंबाचे दुष्ट शक्तिपासून रक्षण करीत आहे. |
| २० जून | : मागील महिन्यातील सेवाकार्याचा प्रवास आशीर्वादीत केल्याबद्दल देवाची स्तुति करुया. |
| २१ जून | : स्तुति करुया, आमच्या सर्व पाठीराख्यांसाठी; त्यांच्या प्रार्थना, आणि आधाराकरिता. |
| २२ जून | : देवाने आमच्या सर्व सेवाकार्यातील कार्यक्रम आशीर्वादीत केल्याबद्दल स्तुति करुया. |
| २३ जून | : देवाने आम्हाला उत्तर प्रदेशातील शुभवर्तमान न पोहचलेल्या भागात ते घेऊन जाणे शक्य होऊ दिले. |
| २४ जून | : आमच्या ऑनलाईन हिन्दी थियॉलॉजीकल अभ्यास क्रमावरील देवाच्या विपुल दयेबद्दल त्याची स्तुति करुया. |
| २५ जून | : देवाने आमच्या मुख्य आणि शाखा मंडळ्यां मध्ये नवीन विश्वासणाऱ्यांची भर घालून आशीर्वादीत केले. |
| २६ जून | : आमच्या मासिकाच्या सर्व सहसंपादक आणि त्यांच्या कुटुंबांबद्दल स्तुति करुया. |
| २७ जून | : आम्हाला मिशन क्षेत्रांद्वारे चांगले अहवाल प्राप्त होत आहेत. |
| २८ जून | : आजपर्यंत संस्था चालविण्याकरिता करीत असलेले आमचे सर्व प्रयत्न देवाने फलद्रुप केल्याबद्दल देवाची स्तुति करुया. |
| २९ जून | : आमच्या रविवारच्या आणि इतर आराधना सभांवर देवाच्या असलेल्या कृपामय दयेबद्दल स्तुति करुया. |
| ३० जून | : मुख्य मंडळीतील स्त्रियांची सभा-सहभागीता देवाने आशीर्वादीत केली. |
| १ जुलै | : १९६७ सालापासून मासिक प्रसिद्ध करण्याच्या सेवेस प्राप्त झालेल्या आशीर्वादाबद्दल देवाची स्तुति करुया. |
| २ जुलै | : मुख्य मंडळीतील पुरुषांची सहभागीता देवाने आशीर्वादीत केली. |
| ३ जुलै | : आमच्या मुद्रणालयात १६ भाषांत छापून ते मिशन क्षेत्रात पाठविण्यात आलेले शुभवर्तमान साहित्य देवाने आशीर्वादीत केले. |

## ✝ प्रार्थने करीता मुद्दे

| | |
|---|---|
| ०४ जुलै | : इंग्रजी मासिकाचे सहसंपदक बंधु मॅन्युएल पॉलराज यांना पूर्ण प्रकृति स्वास्थ्य लाभावे याकरीता प्रार्थना करीत राहू या. |
| ०५ जुलै | : एको ऑफ हिज कॉल सेवा कार्याकरिता देवाने आणखीन समर्पित सेवक पुरवावेत. |
| ०६ जुलै | : देवाने आमच्या सर्व पाळकांना आणि समन्वयकांना नवीन शक्ति पुरवावी. |
| ०७ जुलै | : जागतिक आध्यात्मिक पुढाऱ्यांकरीता प्रार्थना करुया. |
| ०८ जुलै | : देवाने जगातील सर्व देशांतील लोकांना आशीर्वाद द्यावेत. |
| ०९ जुलै | : देवाने आमच्या वरिष्ठ पाळकांना त्यांचे आत्मचरित्र लिहिण्यास मनाचा मोठेपणा द्यावा. या करीता प्रार्थना करा. |
| १० जुलै | : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन आणि महान आज्ञापालनातील भागीदारांकरीता प्रार्थना करुया. |
| ११ जुलै | : देवाने या महिन्यातील एको ऑफ हिज कॉल सेवा कार्याकरिता आवश्यक गरजां करीता निधी उपलब्ध करावा. |
| १२ जुलै | : मिशन क्षेत्रांतील सेवकांकरिता प्रार्थना करुया. |
| १३ जुलै | : आमच्या सर्व सेवा सभांना आणि प्रशासकीय कार्याला देवाची मान्यता असावी. |
| १४ जुलै | : सेवा कार्यातील आर्थीक गरजांकरिता प्रार्थना करा. |
| १५ जुलै | : जगभरातून करोना महामारीचे पूर्ण उच्च्याटन व्हावे. |
| १६ जुलै | : स्त्रिया व लेकरे यांच्या वरील अत्याचार संपुष्टात यावेत यासाठी प्रार्थना करुया. |
| १७ जुलै | : सर्व ख्रिस्ती संस्थांकरिता प्रार्थना करुया. |
| १८ जुलै | : देवाने आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस्. सॅम. सेल्वाराज आणि त्यांच्या कुटुंबाला सर्व दुष्ट शक्तिंपासून सुरक्षित ठेवित रहावे, यासाठी प्रार्थना करुया. |

(पान ४ वरुन)

या कार्यक्रमातून दिली जात असल्यामुळे भोळसट लोक फसले जाऊन गोंधळाच्या भोवऱ्यात सापडतात. चुकीचा संदेश देणारा प्रत्येक वक्ता हा तारणाच्या आत्म्याने बोलण्या ऐवजी स्वत:च्याच इच्छा मांडत असतात. सध्याच्या ऱ्हासामागचा हा देखील पुरावा आहे.

२) तुम्ही देवासमोर तुमचे हात पसरावे! त्याचा अर्थ असा की तुमचे लक्ष आणि भरोसा हा केवळ देवावर आहे. तुमचे सर्व विचार आणि कृति देवाला संतोषविणारी असावी. तुम्ही जर दुसऱ्यांना त्रास देत असाल आणि फसवित असाल, तर लांबलचक प्रार्थना करण्याचा आणि पुष्कळ दिवस उपास करण्यात काहिच उपयोगाचे नाहि. देवाचे वचन न ऐकणाऱ्या व्यक्तिची प्रार्थना तिरस्कारणीय आहे. "**धर्मशास्त्र कानी पडू नये म्हणून जो आपला कान फिरवितो, त्याची प्रार्थना देखील वीट आणणारी आहे.**" (नीति २८:९). "**दुर्जनांचा यज्ञ परमेश्वराला वीट आणितो, परंतु सरळांची प्रार्थना त्याला आनंदविते. दुर्जनांचा मार्ग परमेश्वराला वीट आणितो, पण नीतीला अनुसरतो तो त्याला प्रिय आहे**" (नीति १५:८-९)

आज तुमचे लक्ष कशावर केंद्रित आहे? मदतीची अपेक्षा कोणाकडून अपेक्षित आहात? कोणत्या मार्गाने तुम्ही शोध करीत आहात.

## ३) मन खेदित झाले आहे!

"**आनंदी मनाने मुख प्रसन्न होते; मनांतील खेदाने हृदय भंग पावते.**" (नीति १५:१३). "**आनंदी हृदय हे उत्कृष्ट औषध होय; खिन्न हृदय हाडे शुष्क करिते.**"

लोखंड, पितळ किंवा अल्युमिनीयम धातुने घडविलेली कोणतीहि तुटलेली वस्तु सरसाने चिकटविता येते. परंतु आपल्या हृदयात लपलेले मन तुटले, तर कोणताहि निष्णात डॉक्टर, मानसरोग चिकित्सक ते दुरुस्त करू शकत नाही. या जगात सामोरे जावे लागणारे अपयश, आर्थिक गोंधळ, आजार आणि कौटुंबिक समस्या हे सर्व हृदय किंवा मन खिन्न होण्यामागची कारणे आहेत. यावर मात करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे देवाकडे जाणे हा होय. "**आपण परमेश्वराच्या मंदिराला जाऊ असे ते मला म्हणाले, तेव्हा मला आनंद झाला.**" (स्तोत्र १२२:१)

खऱ्या अर्थाने देवाची स्तुति-आराधना करणाऱ्या लोकांबरोबर जाणे अतिशय महत्वाचे आहे. आत्म्यात आणि खरेपणाने ज्या मंडळीत देवाची स्तुति-आराधना होते; अशा ठिकाणी तुम्ही पवित्रत्म्याने भरून, टाळ्या वाजवून, हात उंचावून, गुडघ्यांवर येऊन आनंदाने उपासना करावी. तेव्हा तुम्ही आनंदाने भरून जाल, तुमचा आजार नाहिसा होईल, तुमच्या विरूद्ध करण्यात आलेला जादुटोणा निष्क्रीय होऊन तुमची त्यां बंधनातून कायमची सुटका होईल.

आमच्या विविध भाषिक **इको ऑफ हिज कॉल** मंडळीतील आराधनेत आम्ही हे अनुभवित आहोत. किती मोठा आनंद! आम्ही कितीतरी आनंदी आहोत! किती शांति आम्ही उपभोगित आहोत! प्रिय पास्टर, तुमच्या मंडळीतील सभासदांना अशा प्रकारे आराधना करण्यात पुढाकार घ्या आणि त्यांना त्यांच्या बंधनातून मुक्त होण्यात मदत करा! प्रिय वाचकहो, मंडळीला महत्व द्या. म्हणजे तुमच्या मंडळीच्या द्वारे तुम्ही आशीर्वादीत व्हाल. "**प्रभुमध्ये सर्वदा आनंद करा; पुन:हि सांगतो आनंद करा.**" (फिलिप्पै ४:४) केवळ मंडळी! मंडळीच केवळ!! मंडळी हि एक अशी जागा आहे, जेथे देव आशाहिनांना आशा आणि निराशजनांना आनंद देत असतो. तुमच्या मंडळींच्या रविवारच्या आणि आठवड्यांतील सर्व उपासनांना हजर राहा. "**जे परमेश्वराच्या मंदिरात रोपलेले असतात. आपल्या देवाच्या अंगणात समृद्ध होतील.**" (स्तोत्र ९२:१३)

## ४) ते औदासिन्यास कारण ठरते!

"**मनुष्याचे मन चिंतेने दबून जाते, परंतु गोड शब्द त्याला आनंदित करितो.**" (नीति १२:१५)

प्रत्यक्षात औदासिन्य हृदय आकुंचन पावण्यास कारण ठरते, ते हृदयाच्या नैसर्गिक कार्यावर बाधा आणते. उदास अवस्थेत लोक मोकळेपणाने विचार करू शकत नाहि. आपल्या मनात कोणत्यातरी समस्येमुळे ते बदल घडतात. ते आपणस टोकाचे निर्णय घेण्यास भाग पाडतात. काहिजण त्यांचे घर सोडून बाहेर पडतात व जेथे शांति मिळू शकेल अशी जागा शोधीत फिरतात. काहिजण विविध मार्गांनी त्यांची समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतात आणि अपयश प्राप्त झाल्यास अंतिम पाऊल उचलतात-टोकाची भूमिका घेतात. एक रहस्य असे आहे, जे कोणी येशू ख्रिस्ताच्या मार्गात जीवन जगतात ते आत्महत्या करण्याचा कधीहि विचार करणार नाहीत. हि अद्भूत अशी वस्तुस्थिती आहे! येथे ख्रिस्ती धर्माची विचारधारा-मार्ग इतर धर्माच्या कल्पनांपेक्षा भक्कम उभा राहतो.

दाविदाला जरी असंख्य समस्यांना सामोरे जावे लागले, त्याच्या देवावर दृढ असा विश्वास होता. "**दावीद मोठ्या पेचांत पडला... पण दावीद आपला देव परमेश्वर याजवर भिस्त ठेवून खंबीर राहिला.**" (१ शमुवेल ३०:६)

## ५) दावीदाचे दररोजचे अनुभव:

"**हे देवा, मजवर दया कर, कारण मनुष्ये माझा पिच्छा पुरवीत आहेत; दिवसभर मजशी लढून त्यांनी माझा छळ मांडिला आहे.**" (स्तोत्र ५६:१)

दु:खे आणि त्रास हे तीन वेगवेगळ्या मार्गांनी येतात:-

१) आमच्या विचारांमुळे

२) आम्ही जीवनात घेतलेल्या चुकीच्या निर्णयांमुळे

लोकांबद्दल हेवा-मस्तर आणि संताप उत्पन्न झाल्यामुळे.

### *लोकांबद्दल भिती*

काहिवेळा आपण आपल्या बद्दलचा आत्मविश्वास गमावून बसतो; आणि अशा मन:स्थितित आपण अतिशय धोकादायक मन:स्थितीत येतो. अशा स्थितीत दाविद म्हणतो, "मनुष्य मला गिळकृत करील." भीति आणि संशय कोणत्याहि सामर्थी पुरुषास निकामी करतील. याबाबतीत दुमत नाहि.

शत्रू दावीदाचा पिच्छा करीत असताना, त्याला इतरांकडून त्याजवर हल्ला होण्याचा आणि युद्ध लादले जाण्याची सतत भीति होती. तो कुटुंब आणि नातेवाईकांकडून संकटात लोटले जाण्याची भीति नाकारु शकत नव्हता.

"**मला भीति प्राप्त होऊन मी थरथरा कापू लागलो, माझी हाडे लटलटूं लागली; माझ्या तोंडाजवळून वायुस्वरुपी असा कोणी गेला; तेव्हा माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले.**" (इयोब ४:१४-१५)

एका भीति बद्दल वचनात ती घडू नये अशी तीव्र भावना व्यक्त केली आहे. आश्चर्य वाटू नये, ती अशी कबर आहे.

ज्या लोकांना अग्नीच्या सरोवरात वाटा असण्याची भीति आहे. बायबल अशांची यादि प्रथम देत आहे, याविषयी आश्चर्य वाटू नये. "**परंतु भेकड, विश्वास न ठेवणारे अमंगळ, 'खून करणारे', जारकर्मी, चेटकी, मूर्तिपूजक, व सर्व लबाड यांस 'अग्नीच्या' व गंधकाच्या जळत्या 'सरोवरात' वाटा मिळेल. हे दुसरे मरण आहे.**" (प्रकटी २१:८) जर याकडे दुर्लक्ष केले तर अनंतकाळ असह्य होईल. जो आपण केवळ देवाच्या दुधारी तरवारी द्वारे आपण ती भीति उघड करून आपल्या जीवनातून काढून टाकू शकतो.

प्रथमत: आपण भीति खऱ्या अर्थाने ओळखली पाहिजे. भीति अंधकाराचा आत्मा आहे. ''**देवाने आपल्याला भित्रेपणाचा नव्हे, तर सामर्थ्याचा, प्रीतीचा व अनुशासनाचा आत्मा दिला आहे.**'' (२ तीमथी १:७) त्याचा उगम नरक आहे आणि त्याचे देवाशी कोणतेहि देणे-घेणे नाहि. खरे पाहिले तर त्याची उपस्थिती मनुष्याला देवापासून दूर ठेविते. कांहि लोक भीति हि एक स्वभाववृत्ति समजतात, एक तयार झालेला स्वभाव किंवा सर्वसाधारणपणे एक सवय असे समजतात. भीति जर सहजतेने घेतली तर भयंकर असे आत्मिक मूर्खपण ठरेल. ते प्रत्यक्षात अणूबॉम्ब मध्ये अणूकण फुगवून तुमच्या जीवनात महासंकट घडवू शकतो. ते शैतानाकडून आहे. त्यामुळे त्याचा प्रतिकार करा - विरोध करा. आज भीति सहज करणे हे सिंहाचे पिल्लू वाढविण्यासारखे होईल. एक दिवस ते तुम्हाला इजा करील आणि तुमचा बळी घेईल. त्या दुष्ट आत्म्याला तुमच्या जीवनातून घालवून द्या, त्याची खूण देखील राहू देवू नका!

देवाचे वचन भितीच्या आत्म्याबद्दल काय म्हणते हे समजल्यामुळे आता या क्षणाला त्याच्या विरोधात भांडण्यासाठी उभे राहा आणि त्याला घालवून द्या. शत्रूच्या विरोधात, विश्वासनाऱ्यांच्या हातात येशूचे रक्त हे प्राणद्योतक असे शस्त्र आहे. प्रत्येकवेळी तुम्ही त्याचा उपयोग करिता तेव्हा शत्रू त्याच्या मार्गात थिजून जातो - थंडगार पडतो. सैतानाला लटपटू द्या. आपल्या जीवनांतील उपजीविकेचा एक क्षुल्लक भाग देखील येशूच्या रक्ताशिवाय आच्छादिलेला नसावा. असे असल्यास दुष्ट आत्मा निष्क्रीय होईल.

''**मला कशाचीहि भीति वाटली तर तेच मजवर येते, कशानेहि मला थरकांप झाला तर तेच मजवर येते.**'' (ईयोब ३:२५)

सैतान जेव्हा उघडा पाडला जातो त्याच वेळेस त्याला तो दुर्बल असल्याचे वाटते, कारण आज पर्यंत त्याने त्याचे स्वरूप दाखविलेले नाहि, आणि ते तो नरकामध्ये जाऊ पर्यंत दाखविणार नाही. आपल्या जीवनांतून दुष्ट आत्म्याला टाकून द्यावयाचे असेल तर, केवळ आपल्या उद्धारकर्त्या येशू ख्रिस्त याचे रक्त आणि आणि दृढ विश्वास याला धरुन रहावे. ती मुखवटा घालून सर्वत्र फिरणारा प्रमुख फसविणारा आहे. २ करिंथ २:११ वचनात जे सांगण्यात आले आहे. त्याबद्दल देवाला धन्यवाद, ''**यासाठी की सैतानाचे आपल्यावर वर्चस्व होऊ नये, त्याचे विचार आपल्याला कळत नाहीत असे नाही.**'' सैतानाशी संबंध येतो तेव्हा त्याच्याशी दोन हात करताना - सामना करताना, आपण त्याच्या विश्वासघाता बद्दल निश्चितच सावध असावे.

## द्वारपाल

द्वारपालाचे काम, त्याच्या मालकाच्या अगोदर पुढे जाऊन त्याला आंत येण्याकरिता दरवाजा उघडणे हे आहे. भीति हि सैतानाचे द्वारपाल आहे. फार मोठे काम पूर्ण करण्यासाठी सैतानाकरिता भीति अत्यंत गरजेची असते. सैतानाकडे जे सर्व संघटित आहे. त्यात सर्वात शेवट भीति हि आहे. सैतान भीतिच्या आत्म्याला त्याच्यासोबत जाण्या अगोदर सर्व प्रथम आपल्या सर्व योजना देतो. भीति एक दुष्ट आत्मा आहे, जो देवाचा प्रमुखशत्रु म्हणून सैतानाला त्याचे बी पेरता यावे यासाठी मशागत करण्यासाठी पुढे जातो. भीति सैतानाच्या कार्याकरिता वातावरण, उपस्थिती, माध्यम आणि परिस्थिती निर्माण करते. आपल्याला ईयोबाच्या बाबतीत खरे झालेले पहावयास मिळते ''....ज्याची मला अतिशय भीति वाटत होती. तेच मजवर आले आहे.'' ज्या प्रमाणे विश्वास हा देवाचे न दिसणारे आशीर्वाद नैसर्गिक जगीक राज्यात आणतो, भीति न दिसणाऱ्या सैतानी गोष्टि दिसणाऱ्या जगात आणते. सैतान त्याचे जे सर्व वाईट आणि नाशकारक असे ते मनुष्याच्या जीवनात आणण्यास भीतिचा 'पुला'प्रमाणे उपयोग करीत असतो.

सैतान त्याच्या मनासारखे करून घेण्यास मनांत विचारांची पेरणी करतो. भितीदायक विचारांना नेहमीच विरोध करा, नाकारा आणि दूर करा किंवा त्यांचा तिरस्कार करा. त्यांचा कदापी स्विकार करु नका. भितीच्या आत्म्याला तुमच्या पावित्र्ययुक्त जीवन बांधणी द्वारे दूर करा. भिती विषयी उघडपणे बोलू नका. ती विषयी बेलणे म्हणजे तिचा प्रचार करणे सारखे होते.

## शब्दांचा विपर्यास

''**दिवसभर ते माझ्या शब्दांचा विपर्यास करितात; त्यांचे सर्व विचार मजविरुद्ध; माझ्या वाईटासाठी असतात.**'' (स्तोत्र ५६:५)

आपल्यापैकी अनेकांना वेगवेगळ्या मार्गांनी अडचणी उद्भवत असतात. आमच्या कामाच्या जागी, आपण जे बोललो देखील नाहि अशा बद्दल आपल्याला दोष लावण्यात येतो. दाविदाला देखील त्याच्या शब्दांचा विपर्यास करून दोषी ठरविला जाण्याचा अनुभव आला. असे केवळ एकदाच घडले नाहि तर ते वारंवार घडत होते.

आपल्या दररोजच्या जीवनात जरी अशी अनपेक्षित परिस्थिती उद्भवली, आपण हे कदापी विसरु नये, कि सर्व वाईट गोष्टि चांगल्यात बदलणारा देव सदैव आपल्या सोबत आहे. स्तोत्र ३४:१९ या वचनात आपण वाचते, ''धार्मिकाला बहुत कष्ट होतात; तरी परमेश्वर त्या सर्वांतून त्याला सोडवितो.'' आपण कठीण अशा समयातून जात असताना असा विचार करू नये की हा आपल्या जीवनाचा शेवट आहे. आपल्याला कळले पाहिजे की, धार्मिक मनुष्याला बहुत कष्ट होतात, परंतु देव त्याची त्या सर्व स्थितीतून सुटका करुन त्याला आनंदी जीवन जगावयास देतो. परंतु तुम्ही धार्मिक व्यक्ति आहात कां? प्रभु येशू ख्रिस्ताद्वारे तुमच्या पापांची क्षमा झालेली आहे कां? तुम्ही जीवनात कोणतेहि पाप नाहि अशा प्रकारचे प्रामाणिकतेला धरुन जीवन जगत आहात कां? या सर्वात अतिशय महत्त्व आहे.

''**जेवढे दिवस तूं आम्हांस पीडिले, जेवढी वर्षे आम्ही दु:ख भोगिले त्याच्या मानानें आम्हांस आनंदित कर.**'' (स्तोत्र ९०:१५) या प्रार्थनेनुसार देव, आपण जे सर्व गमाविले ते सर्व भरुन देण्यास आणि आपल्याला सुखी, दिर्घायुष्य देण्यास सामर्थ्यवान आहे. धार्मिकतेमुळे तुम्ही दु:ख सहनकरिता, तेव्हा तुमच्या जीवन काळात वाढ होते. भिऊ नका.

संकटांच्या दिवसात, विपत्तीच्या दिवसात, निश्‍चिच, मी धरिन विश्वास येशू ख्रिस्तावर, धरीन विश्वास मी येशू ख्रिस्तावर.

भीतिदायक दिवसात, अतिशय भीतिदायक दिवसात प्रेम व्यक्त करीत येशू ख्रिस्तावर, निश्चितच प्रेम व्यक्त करीन येशू ख्रिस्तावर.

तुमच्या मुखातून उच्चारिलेले विश्वासाचे आणि आशेचे शब्द तुमच्या हृदयात निश्चितच आनंद आणि खात्री आणील.

सर्वसाधारण: पुष्कळ मोठ्या त्रासाच्या ओझ्याखाली असतो अशावेळी उच्चारलेले शब्द हे चांगले शब्द नसतात. जरी आपण अतिशय अनुभवि ख्रिस्ती असलो, आपल्या मुखाद्वारे पुढील शब्द निघतात.

१) मी तुझा धावा करितो, पण तुं ऐकत नाहीस (ईयोब ३०:२०)

२) मी उभा राहतो; पण तूं मजवर डोळे वटारितोस (ईयोब ३०:२०)

३) तूं मजशी निष्ठुर बनला आहेस; (ईयोब ३०:२१)

४) तूं आपल्या बाहुबलानें माझा छळ

(अनुसंधान पान ९ वर)



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**“नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !” (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

**माझे तारुण्यातील हृदयाचे स्पंदन आणि रक्त प्रवाह हा केवळ माझ्या येशू करीता, माझ्या निर्माण कर्त्यासाठी होता !!!**



सन्यासिनी एमियाम्मल अम्मल


१९६७ साली सिस्टर एमियाम्मल सन्यासिनी अम्मल ज्या एक आदरणीय मिशनरी सुवार्तिक होत्या, त्यांनी नेय्युर येथील मेमोरियल हॉल मध्ये ३ दिवसांच्या सुवार्ता सभा आयोजीत केल्या. माझे प्राथमिक शिक्षण त्या गावात झाले होते. त्या अतिशय वयस्कर अशा स्त्री होत्या. नाझरेथ प्रेअर फेलोशिप' मधील काही बंधुजन, बंधु. मायकल चेल्लादुराई, बंधु. जॉन विकलीफ, बंधु. जॉशवा गन्नादुराई आणि बंधु. जॉन कोईलपिचायी, इतर काही देवाच्या सेवकांसह आले आणि येशू ख्रिस्तासंबंधी संदेश दिले, त्यांची स्वत:ची साक्षी देखील दिल्या. सिस्टर एमियाम्मल सन्यासिनी अम्मल यांनी या सेवकांना मदत करण्याकरिता माझा उपयोग करुन घेतला. मी त्या सेवकांना पाणी पुरवित असे, त्यांचे कपडे धुत असे, त्यांचे जोडे स्वच्छ करित असे, त्यांच्या करिता भोजनाची व्यवस्था करित असे आणि त्यांच्या सोबत राहून त्यांच्या सर्व कामात त्यांना मदत करीत असे. ते सर्व सेवक **डॉ. अय्यादुराई** यांच्या ॲंग्लो इंडीजीनीयस् क्लिनीकच्या वरच्या मजल्यावरील घरात रहात होते. डॉ. डी. अय्यादुराई यांना सेवेबद्दल ओझे होते. आणि ते देवाच्या सेवकांना आर्थिक मदत करीत असत. त्यांचे धाकटे बंधु **डॉ. डी. सायमन** जे **'शिशु वैद्या आश्रम'** नावाचे बालकांचे हॉस्पीटल चालवीत होते. त्यांचे माझ्यावर खुप प्रेम होते आणि ते मला उत्तेजन देत असत. एकदा त्यांनी मजकडे पाहिले आणि, “तुजमध्ये काहितरी विशेष आहे.” असे म्हणून माझे कौतुक केले. त्यावेळी मी १८ वर्षांचा होतो.



बंधु जॉन विकलीफ



डॉ. डी. अय्यादुराई



डॉ. डी. सायमन



बंधु. जोशुआ ज्ञानदुराई, बंधु. मादीकल चेल्लादुराई, बंधु. जॉन आरपुथराज

त्यात तीन दिवसांच्या सभांमध्ये **'नाझरेथ प्रेअर फेलोशिपच्या'** तरुण सेवकांनी त्यांचे येशू ख्रिस्ताच्या द्वारे तारण कसे झाले, आणि जगीक पातकांपासून, विशेषकरून सिनेमा आणि सिनेमाची गाणी यापासूनच कशी सुटका झाली याविषयी साथ दिली. त्यांच्या जीवनावरील जगीक मनोरंजनाच्या प्रभावातून कशी सुटका झाली. त्याविषयी सांगितले ख्रिस्त येशू मध्ये पवित्रतेचे जीवन जगण्याद्वारे जे सुखसमाधान प्राप्त होऊ शकते ते समजावून सांगितले.

त्या सभांच्या शेवटच्या दिवशी मला माझ्या पातकी जीवनाची जाणीव झाली आणि मी प्रभु येशू ख्रिस्ताचा माझा वैयक्तिक तारणारा म्हणून स्विकार केला. पवित्रतेचे जीवन जगणे मला आवडू लागले. मी कोणतीही अट न घालता निर्णय घेतला कि मी एक उपयुक्ततेचे जीवन जगून देवाकरीता काहितरी करावे. देवाच्या जीवंत वचनाच्या द्वारे तारणाचा आशीर्वाद प्राप्त झाला. “**....आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रुपांतर होऊ द्या...**” (रोम १२:२)


या सभां संपल्यानंतर, “**नाझरेथ प्रेअर फेलोशिपच्या**” देवाच्या दासांनी मजबद्दल गहन अशी प्रीति आणि काळजी व्यक्त केली आणि मी त्यांच्या सोबत त्यांच्या ठीकाणी यावे असे आमंत्रण दिले. मी त्यांच्या सोबत जाण्यासाठी माझ्या आई-वडीलांची परवानगी घेतली. त्यांनी मला तीरुवेल्ली जिल्ह्यातील नाझरेथ या गावी घेऊन गेले. मिशनरी सुवार्तिक सिस्टर एमियाम्मल सन्यासिनी अम्मल या देखील आमच्या सोबत होत्या.

### 'सर्वश्रेष्ठ अनुभव! नाझरेथ प्रेअर फेलोशिप!'

वाळलेल्या गवताचे छप्पर असलेली ती पडवी होती. त्या पडवीत सायंकाळच्या सभेकरीता मारगोशीष शाळा आणि महा विद्यालयातील उच्चशिक्षित विद्यार्थी, शिक्षक, व्याख्याते आणि इतर कळकळ

असणारे पुरूष दररोज हजर रहात असत. सकाळी साधा नाष्टा दिला जाई!!! दुपारच्या जेवणात भाता बरोबर सांबार, रस्सम् दिला मिळत असे. रात्रीच्या जेवणात देखील भाताबरोबर चवदार रस्सम दिला जाई. हा माझ्यासाठी अद्भूत असा अनुभव होता. त्या पडवीत मला दिवस-रात्र देवाची समक्षता जाणवत होती. त्या ठीकाणी असणाऱ्या देवाच्या दासांच्या सवयींनी आणि कार्यक्रमांनी मी आकर्षीत झालो. माझ्या ऐकण्यात आले की, उच्च आत्मीक दर्जा असलेले महान असे पुढारी या ठीकाणांतून तयार झाले. त्यांच्या सारखे बनण्याची इच्छा मजमध्ये दररोज प्रकर्षाने वाढत होती.

### ''थेरी येथील अनुभव! एक एकाकी (निर्मनुष्य) जागा!!!



बंधु. जॉन कोईपिचनाई



बंधु. स्टेनली
आशीर्वादीत युवा मिशन

सर्व सभासद दररोज सायंकाळी ५ ते रात्री ८ वा वेळेत 'थेरी' नावाच्या जागी एकत्र येत असत. ती तांबडी माती असलेली एकाकी अशी जागा होती. या ठीकाणी त्यांची वैयक्तिक प्रार्थना, शास्त्रवाचन, सांघिक प्रार्थना, साक्ष इत्यादि होत असे. त्यांनी मला देखील त्या प्रार्थनामध्ये सहभागी होण्याची परवानगी दिली आणि प्रार्थनामय जीवनाचे रहस्य आणि पवित्र आत्म्याद्वारे मार्गदर्शीत जीवनशैली विषयी शिकविले.

मला आज देखील त्यांच्यापैकी काहि जण लक्षात आहेत. बंधु. शांत कुमार, बंधु. जेकब सेल्वाराज, बंधु. जॉन अरपुथराज, बंधु. पाकीयाराज, बंधु. फिलिप जयसिंग, बंधु. गुनाशेकर, बंधु. कुमारदास (थेंकसी), बंधु. ईम्यॅनुएल, बंधु. कुमार, बंधु. स्टॅनली, बंधु. डॅनिएल, बंधु. गीदिओन, बंधु. सॅम्युएल, बंधु. तिमथी, बंधु. मानिक्कम्, बंधु. काळेब पॉल पाण्डीयन, बंधु. जोसेफ गुनासिंग, बंधु. तितुस मारीया सुंदरम, बंधु. बेन्नी, बंधु. ज्योथी पाण्डीयन इत्यादि.

पंधरा दिवसानंतर सिस्टर एमियाम्मल सन्यासिनी अम्मल या मला माझ्या गावी परत घेऊन जाण्यास आल्या. देवाच्या दासांनी अश्रु ढाळून प्रार्थना केली. त्यावेळी, बंधु मायकल चेल्लादुराई, बंधु जॉन वायक्लीफ, बंधु. जॉशवा गन्नादुराई, बंधु. जॉन कोलीपीचाई आणि इतर वरीष्ठ देवाच्या दासांनी माझ्या डोक्यावर हात ठेवून प्रार्थना केली. प्रार्थना करीत असताना, त्यांच्यापैकी एका बंधुने अशी भविष्यवाणी केली :-

''ओ! सॅम सेल्वाराज! तुला मी मजकरीता निवडीले आहे. मी तुझ्या द्वारे महान अशा गोष्टी करणार आहे. तुझ्या नांवानुसार बायबलमधील



**नाझरेथ प्रार्थना संगत - १९६७**

शमुवेलाप्रमाणेच मी तुला संदेष्टासारखा आणि सामर्थ्यवान पुरुष असा वर उचलीन. मी तुला अनेक लोकांना अन्न भरविणाऱ्या पित्यात बदलीन. तुला देवाचा दास असण्याची लाज वाटणार नाहि आणि तूं प्रभु येशू ख्रिस्तसाठी एक धैर्यवान-धीट पुढारी बनशील. मी तुला उत्तम शरीर स्वास्थ्य आणि निश्चित वर्षाचे आयुष्य देईन. **''तूं माझ्या दृष्टीने अमोल आहेस; तू मोठ्या योग्यतेचा आहेस व मी तुजवर प्रेम करितो म्हणून तुजबद्दल, तुझ्या जिवाबद्दल, मनुष्ये, राष्ट्रे, मी देईन.''** (यशया ४३:४)



त्यानंतर लगेच १९६९ साली देवाने मला त्याचा नम्र दास होण्यासाठी देवाने महान सेवक रेव्ह.एस्. देवदासन, जे त्या समयातील सर्व परिचीत मासिक ''हेरॉल्ड ऑफ हिज कमिंग'च्या प्रमुख संपादकांकडे पाठविले. देव चांगला आहे. *(...to be continued in August 2022 issue)*

पान ७ वरुन

करीत आहेस. (ईयोब ३०:२१)

५) तूं मला वायूवर आरुढ करून उडवीत आहेस. (ईयोब ३०:२२)

६) मी सौख्याची अपेक्षा करीत होतो तो विपत्ति आली. (ईयोब ३०:२६)

७) मी प्रकाशाची अपेक्षा करीत होतो, तो अंधकार आला. (ईयोब ३०:२६)

८) मी अनुभविलेल्या समस्या कोणीहि अनुभविलेल्या नाहीत.

९) माझे आयुष्य शोकांत (ईयोब ३१:१०)

१०) माझी वर्षे उसासे टाकण्यांत गेली आहेत. (ईयोब ३१:१०)

तुम्ही देखील अशा प्रकारच्या परिस्थितीत आहात कां? निराश होऊ नका, नाऊमेद होऊ नका. देव तुमच्या करीता देखील अद्भूते करील. परंतु त्यासाठी काही करावे लागणार आहे :-

१) अविश्वासाचे शब्द उच्चारु नका. तर उलट विश्वासयुक्त आणि आशायुक्त असे शब्द उच्चारा.

२) तुमच्या विश्वासासंबंधात तुम्हांला गोंधळून टाकणाऱ्या लोकांना टाळा. आणि तुम्हाला विश्वासात उत्तेजन देणाऱ्या, तुमच्यासह ख्रिस्तमध्ये उत्तम साक्षीमय जीवन जगण्याकरिता तुमच्या पातळीत वाढ करण्यासाठी झगडणाऱ्या लोकांच्या सहभागितेत - सहवासात राहा.

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

३) काही चांगले घडण्याची जरी शक्यता नसली चमत्कार घडण्याकरिता देवावर आणि त्याच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवा. आशायुक्त प्रार्थनने केवळ त्यांजवर टेका. निश्चितच चमत्कार घडतील.

**"तु माझा विलाप दूर करून मला नाचावयास लाविले आहे."** (स्तोत्र ३०:१०)

- ✲ - ✲ - ✲ - ✲ - ✲ -

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-     आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 13th JUNE 2022**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**